# लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर

## संशोधनात सहभागी होणा-या व्यक्तिंचे अधिकार :

1. समजण्यायोग्य भाषेत संशोधन अभ्यासाविषयी माहिती जाणून घेण्याचा अधिकार.
2. संशोधन अभ्यासात सहभाग घेण्यापूर्वी माहितीयुक्त संमती प्राप्त करण्याचा अधिकार.
3. उपचारांचा अपेक्षित खर्च, कालावधी, अन्य पर्यायी उपचार, प्रवास खर्च किंवा सहभागासाठी प्रदान करण्यात येणारी नुकसान भरपाई याविषयी माहिती घेण्याचा अधिकार.
4. वैयक्तिक प्रतिष्ठा, गोपनीयता आणि गुप्तता राखण्याचा अधिकार.
5. काळजी घेण्याच्या योजनेबाबत माहिती मिळविण्याचा अधिकार.
6. सर्व वर्गातील रुग्णांना आरोग्य सेवेचा समान लाभ मिळविण्याचा अधिकार.
7. अधिकार आणि प्रामाणिकतेच्या उल्लंघनाविरोधात तक्रार दाखल करण्याबाबत जाणून घेण्याचा अधिकार (उदा. नीतिमत्ता समिती सोबत संपर्काचा तपशील)
8. कोणत्याही कारणाचा खुलासा न करता, संशोधनातील सहभाग नाकारण्याचा किंवा कोणत्याही टप्प्यावर अभ्यासातून बाहेर पडण्याचा अधिकार.
9. कोणतीही इजा झाल्यास त्याच्या वैद्यकिय व्यवस्थापनाविषयी माहिती मिळविण्याचा व अभ्यासासंबंधित काही अपाय किंवा मृत्यू झाल्यास नुकसान भरपाई मिळविण्याचा अधिकार.
10. संशोधनकर्त्या डॉक्टरांचा, 24 तास उपलब्ध, तात्काळ संपर्काचा तपशील प्राप्त करण्याचा अधिकार.
11. रुग्णाची माहिती / रुग्णालयातील नोंदींचा तपशील यांच्या गोपनीयतेचा अधिकार.
12. वैद्यकिय नोंदी तपासण्याचा अधिकार

## संशोधनात सहभागी होणा-या व्यक्तिंची कर्तव्ये:

1. पुढील बाबींची संपूर्ण आणि अचूक माहिती देणे.
   1. आपले आरोग्य आणि सध्याचे तसेच मागील आजार, रुग्णालयात दाखल करुन केलेले उपचार, औषधे, ॲलर्जी व शस्त्रक्रिया
   2. पूर्ण नाव, पत्ता व इतर माहिती
   3. वैद्यकिय विमा
2. डॉक्टरां द्वारे निर्धारित केलेल्या उपचार योजना, वेळापत्रक आणि सूचनांचे काळजीपूर्वक पालन करणे.
3. निदान आणि उपचारांबाबत डॉक्टर किंवा अन्य आरोग्यसेवा सदस्यांच्या सूचना समजत नसल्यास शंका विचारणे.
4. डॉक्टर आणि आरोग्यसेवा सदस्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही औषधांचे सेवन न करणे.
5. वैयक्तिक आणि वैद्यकिय नोंदींच्या गोपनीयतेची खात्री करण्यासाठी रुग्णालयाने आखून दिलेल्या उपायांचा स्वीकार करणे.
6. कोणतीही इजा वा नवीन वैद्यकिय समस्या उद्भवल्यास संशोधनकर्त्या डॉक्टरांना त्वरीत सूचित करणे.
7. रुग्णालयातील कर्मचारी, अन्य रुग्ण आणि त्यांना भेटायला येणा-या पाहुण्यांशी सौजन्याने वागणे.

संशोधनात सहभागी व्यक्तिंचे अधिकार आणि जबाबदा-यांशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी कृपया संशोधन विभागात संपर्क करा: 9869436379